**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
दुरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- दिनांक 29 जानेवारी 2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 29, जानेवारी 2024 रोजी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 अंतर्गत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

आपला विश्वासू,
Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 06-02-2025 13:44:12
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक- २९ जानेवारी २०२४, वेळ दुपारी ०३:०० वाजता.
स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| **अ** | **साधूग्राम** | |
| १ | साधूग्रामसाठी निधीची मागणी करताना साधूग्रामसाठी करावयाच्या कामांमध्ये जमीन तयार करणे आणि त्याखालील सर्व कामे, तसेच मागील कुंभमेळ्याचे वेळी पुरविलेल्या सुविधांचा अंतर्भाव करावा. | नाशिक महानगरपालिका |
| २ | साधूग्राम तयार करताना जमिनीखालील बाबी जसे की, विद्युत वायर, सीसीटीव्हीसाठी वापरण्यात येणारे फायबर ऑप्टीक्स व पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन एकाच वेळी टाकण्यात यावी जणेकरुन वेळेची व निधीची बचत होईल. | नाशिक महानगरपालिका, नप त्र्यंबकेश्वर व NMSCDCL |
| ३ | त्र्यंबकेश्वर येथील साधूग्राम तयार करताना मागील कुंभमेळ्यातील साधूग्राममध्ये ज्या कामांचा समावेश केला होता त्याच कामांचा समावेश सन २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी प्राधान्याने करण्यात यावा. त्याचप्रमाणे साधूग्रामसाठी देण्यात येणाऱ्या जमिनीवरील सुविधांमध्ये अनावश्यक वाढ न करता सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी घेण्यात येणाऱ्या वाढीव जमिनीवर प्लॉटची संख्या व स्वच्छतागृहांच्या संख्येत वाढ करण्यात यावी. | नप त्र्यंबकेश्वर |
| **ब** | **धार्मिक नगरी** | |
| १ | प्रस्तावित धार्मिक नगरी तयार करण्यासाठी खासगी व सरकारी अशा दोन प्रकारच्या जागांचा शोध घेऊन त्याची यादी तयार करण्यात यावी. | जिल्हाधिकारी, NMRDA |
| **क** | **सीसीटीव्ही व अनुषंगिक विषय** | |
| १ | सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व खरेदी पद्धतींचे तुलनात्मक विश्लेषण करावे, यासाठी खर्च-लाभ मूल्यांकन, करार प्रकार आणि त्यांचे संबंधित फायदे इत्यादी बाबींचा विचार | NMSCDCL |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | करण्यात यावा. तसेच, प्रत्येक वर्षी लायसन्स विकत घेण्याऐवजी एकदाच विकत घ्यावे, जेणेकरून आर्थिक बचत होईल. यासोबतच कुंभमेळ्यासाठी बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही अंतर्गत Video analytics साठी स्वस्त पर्याय निवडावा (उदा. सेवा विकत घेण्याआधी थेट तांत्रिक क्षमता विकत घेणे किंवा इतर पर्याय, इ.) | |
| २ | नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविताना फायबर ऑप्टीक्स ऐवजी ५G नेटवर्क घेता येईल का याचा विचार करण्यात यावा. | NMSCDCL |
| ३ | सीसीटीव्ही लावल्यानंतर सदर प्रणालीमध्ये सुरक्षा प्रणालीसाठी चेतावणी (alert) निर्माण करता येईल अशा प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. (उदा. gesture recognition, fire alerts, इ.) | NMSCDCL |
| ४ | रामकाल पथासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविताना त्याचे वायर्स व इतर सुविधा (utilities) या जमिनीखालून टाकण्यासाठी योग्य नियोजन करण्यात यावे. | नाशिक महानगरपालिका NMSCDCL |
| ५ | पोलीस विभागाने केवळ आवश्यक असलेल्या ठिकाणांवर (उदा. गर्दी नियंत्रणाच्या ठिकाणी) जेवढी गरज आहे तेवढेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. या बाबत पोलीस विभागाने विश्लेषण करावे जेणेकरुन अनावश्यक खर्च टाळता येईल. | नाशिक शहर पोलीस व नाशिक ग्रामीण पोलीस |
| ६ | रेल्वे स्टेशन व सर्व बस थांब्यांच्या प्रवेश व बाहेर जाण्याच्या ठिकाणी (entry/ exit points) लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत व रेल्वे स्टेशन व सर्व बस थांब्यांच्या अंतर्गत असलेले सीसीटीव्ही चे फीड प्राप्त करुन घ्यावे. | नाशिक शहर पोलीस, NMSCDCL व नाशिक ग्रामीण पोलीस |
| ७ | सर्व सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यानंतर NMSCDCL ने नाशिक महानगरपालिका व पोलीस विभागाला प्रशिक्षण द्यावे. | नाशिक शहर पोलीस, NMSCDCL व नाशिक ग्रामीण पोलीस |
| ८ | खासगी मालमत्तांमध्ये असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फीड घेण्यात यावेत. | NMSCDCL, नाशिक शहर पोलीस व नाशिक ग्रामीण पोलीस |
| **ड** | **GIS पोर्टल** | |
| १ | सध्याच्या GIS पोर्टलवर कामांची माहिती नोंदविताना GIS पोर्टलवर नोंदविलेल्या फाईल्स (uploaded files) या शासनाचे नवीन GIS पोर्टल तयार झाल्यास हार्ड डिस्क मधून किंवा जून्या पोर्टलवरुन | सर्व विभाग |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | एकदाच डाउनलोड करुन नवीन पोर्टलवर अपलोड करता येतील अशा प्रकारे नोंदविण्यात याव्यात. | |
| **ई** | **इतर** | |
| १ | महाराष्ट्र फायर सर्विस व इतर सर्व महानगरपालिकांकडे असलेल्या उपकरणांपैकी किती उपकरणांची मागणी (requisition) करता येईल याची माहिती घेण्यात यावी व उर्वरित उपकरणांची खरेदी करण्यासाठी अभ्यास करण्यात यावा. | अग्निशमन विभाग |
| २ | पोलीस विभागाने त्यांना लागणाऱ्या मनुष्यबळाचा अभ्यास करुनच त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी करावी. | नाशिक शहर पोलीस व नाशिक ग्रामीण पोलीस |
| ३ | त्र्यंबकेश्वर नगर परिषदेने त्र्यंबकेश्वर दर्शन पथचा प्रस्ताव तयार करावा. तसेच, त्र्यंबकेश्वर शहरामध्ये असलेली सर्व शासकीय कार्यालये शहराच्या बाहेर स्थलांतरित करण्याचा पर्याय तपासावा. | नप त्र्यंबकेश्वर |
| ४ | कुभमेळ्यासाठी नेमण्यात आलेल्या/ नेमण्यात येणाऱ्या सल्लागारांनी कुंभमेळयासाठी करावयाच्या कामांची तांत्रिक (technical), वाढवता येणारे (scalable) व व्यवहार्यता (feasibility) तपासूनच स्वस्तात उपलब्ध होणारे पर्याय सूचवावेत. | सर्व विभाग |
| ५ | सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली (STP), सांडपाणी पंपिंग स्टेशन (SPS), गोदावरी व तिच्या उपनद्या यामध्ये मिसळणाऱ्या नाल्यांच्या पाण्यामुळे होणारे प्रदूषण थांबविण्याच्या दृष्टीकोनातून नाले अडविणे व वळविण्याचे कामे करणे (ILD), वाहनतळ, रस्ते, अग्निशमन, दर्शनपथ व त्र्यंबकेश्वर येथील शासकीय कार्यालयांच स्थलांतरण या विषयांबाबत चर्चा करण्यासाठी मंगळवार दिनांक, ११ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे बैठकीचे आयोजन करण्यात येत असल्याचे सर्वांना सूचित करण्यात आले. | नाशिक महानगरपालिका, नप त्र्यंबकेश्वर, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक शहर पोलीस, नाशिक ग्रामीण पोलीस, ST महामंडळ व निवासी उपजिल्हाधिकारी |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 05-02-2025 18:57:49

(डा. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

# बैठकीस उपस्थितांची यादी.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कार्यालयाचा ई-मेल आयडी | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मनिषा खत्री | आयुक्त,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | | |
| 2 | श्रीम. संगिता निकम | ACP (प्रशासन) | sangitanikam41@gmail.com | 7798530397 |
| 3 | श्री. योगेंद्र चौधरी | DPO | | 7387923124 |
| 4 | डॉ. श्रीया देवचके | मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद | cotmc.tbk@gmail.com | 8108477105 |
| 5 | श्री. स्वप्नील काकड | Engineer Trimbak MC | cotmc.tbk@gmail.com | 9022572057 |
| 6 | श्री. विजय सोनार | प्रभारी संगणक अभियंता | cotmc.tbk@gmail.com | 9890010871 |
| 7 | श्री. जे.जे. सिंह | ISPL Pvt. Ltd | jjsingh@gmail.com | 9953439900 |
| 8 | श्री. संजय अग्रवाल | City Engineer, NMC | | 9922445119 |
| 9 | श्री. रविंद्र धारणकर | कार्यकारी अभियंता | | 9422222965 |
| 10 | श्री. संदेश शिंदे | Ex. Engineer | | 9422448128 |
| 11 | श्रीम. जयश्रीराणी सुर्वे | महानगर नियोजनकार<br>ना.म.प्र.वि.प्रा | | 9822163646 |
| 12 | श्रीम. स्वाती थविल | उपजिल्हाधिकारी भुसंपादन,<br>(PALAQ) नाशिक | slaoirrigationnsk@gmail.com | 9420736099 |
| 13 | श्री. राजेंद्र वाघ | निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जि.का. नाशिक | | 9423468111 |
| 14 | श्री. योगेश सोमवंशी | Assi. Research Officer Div<br>Com. Office | nashik.osd@gmail.com | 9049704035 |
| 15 | उत्कर्षा पाटनकर | QCI | | 9372914591 |
| 16 | श्रीम.नेहा ठाकरे | QCI | | 8657150666 |
| 17 | श्री. अभय वशिस्थ | District Disaster<br>Management Support | | 9650452597 |
| 18 | श्रीकृष्णा देशपांडे | DDMO | | 7387442580 |
| 19 | अनिकेत कुलकर्णी | NMC | | 8007639099 |
| 20 | श्री. अजीत निकट | Dy. Commissionr, NMC | ajitnikat@gmail.com | 7588168672 |
| 21 | श्री. मयुर पाटील | Dy. Commissionr | pmayur06@gmail.com | 8087627141 |
| 22 | Shachi Singh | Consultant, Nashik Smart<br>City | shachi.sing@in.ey.com | 8512853883 |
| 23 | श्री. पियुष रंजन | Consultant, Nashik Smart<br>City | piyush.ranjan@in.ey.com | 8826622799 |
| 24 | श्रीम. पुर्वा माळी | JE Water Supply Trimbak<br>M.C | cotmc.tbk@gmail.com | 9604547073 |
| 25 | श्री. नंदकिशोर काळे | कार्यकारी अभियंता, महावितरण | senskurban@gmail.com | 7875766020 |

| अ.क्र. | नाव | पदनाम | कार्यालयाचा ई-मेल आयडी | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| 26 | श्री. चेतन वाडे | EE NUD-I MSEDCL | eenashiku1@gmail.com | 7875766021 |
| 27 | श्री. निलेश बोडखे | API Nashik Rural | kumbhacellnskr@gmail.com | 9511557007 |
| 28 | श्रीम. मनिषा कांबळे | WPC Nashik City Police | dcp-hq.cpnasik@gov.in | 7030645489 |